# रोली-पोली आणि सू

न्युयॉर्क राज्यातल्या सिरॅक्यूज शहरात छोटी सुषमा, तिचे आई-बाबा व छोटा भाऊ वामन रहात होते. सुषमा सात वर्षांची हुशार व चुणचुणीत मुलगी होती. सुषमाच्या मैत्रिणी तिला सू म्हणत असत.

एकदा एका फॉलच्या संध्याकाळी सू व तिच्या दोन मैत्रिणी घरामागच्या (patio) पॅटिओवर खेळत होत्या. आई स्वैंपाक करत होती व छोटा वामन ब्लॉकचा टॉवर बांधत होता. खेळता-खेळता सूच्या मैत्रिणीचं लक्ष जमिनीवर चालणाऱ्या अनेक रोली-पोलीं कडे गेलं. तिघिंनी पटापट एक एक रोली-पोली हातावर उचलून घेतली. रोली-पोलींनी अंगाचा घट्ट बॉल केला. रोली-पोली खाली सोडल्यावर जरा वेळानी परत पसरल्या व आपल्या अनेक पायांनी चालू लागल्या.

"आपण एक नव खेळ खेळूया," सूची एक मैत्रिण म्हणाली.

"कुठचा खेळ? सू व तिच्या दुसऱ्या मैत्रिणीने विचारले.

"आपण आपल्या रोली-पोलीला Strawberry स्ट्रॉबेरी चे पान खायला घालूया. जिची रोली-पोली सर्वात आधी पान संपवेल, ती जिंकेल," पहिली मैत्रिण म्हणाली.

सगळयांनाच नवा खेळ आवडला. तिघींनी जाऊन स्ट्रॉबेरीची छोटी-छोटी पानं तोडून आणली व पुन्हा एकदा एकेक रोली-पोलीचा किडा उचलला. हात लावताच रोली-पोलींचे पुन्हा घट्ट बॉल्स झाले. सू व तिच्या मैत्रिणी आपआपली पानं रोली-पोलींच्या न दिसणाऱ्या तोंडापाशी नेत होत्या. पण रोली-पोली आणखीनच घट्ट बॉल करून अंग चोरत होत्या. मुलींनी खूप वेळ प्रयत्न केला पण रोली-पोलींना पान भरवता आली नाहीत. शेवटी कंटाळून सू व तिच्या दोघी मैत्रिणी घरी परत आल्या.

रात्री झोपताना सूने ही गोष्ट आईला सांगितली व म्हणाली रोली-पोली अगदी स्टुपिड आहेत. मला मुळीच आवडत नाहीत. आई हसली व म्हणाली, " अग वेडे! जेंव्हा त्या रोली-पोलींना खात्री होईल की आपल्या जिवाला धोका नाही तेंव्हा त्या तुमची पानं खातील. त्यांचही आपल्यासारखंच आहे. जेंव्हा आपलं मन स्थिर व आनंदी असतं तेंव्हाच आपण नवीन गोष्टी आत्मसात करू शकतो." आईने सूच्या केसांवरून मायेने हात फिरवला व सू शांतपणे झोपली.

